तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. मंगळवारी ८३३७ पैकी ७७३७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ६०० विद्यार्थी अनुपस्थित होते. बी. कॉम आयटी, बी. कॉम. बँक मॅनेजमेंट, बी. एस्सी. बायोटेक, बी. एस्सी. आयटी, बी. एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ इंटीरियर डिझायनिंग, एम. ए., एम. एस्सी., कॉम्प्युटर सायन्स अशा ४३८ विषयांच्या परीक्षांना १० ऑगस्टपासून सुरूवात झाली आहे. विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी विद्यापीठ प्रशासनाकडून दूर करण्यात आल्या. ज्यांना तांत्रिक अडचणी येतील त्यांनी विद्यापीठाच्या संपर्क क्रमांकाशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहेत.

सकाळ

# आई, भावंडे सुरक्षित असतील काय?

## कोल्हापुरात शिक्षण घेणाऱ्या काबूलमधील अमानुल्लाच्या भावना

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : ''मी तीन दिवस जेवलेलो नाही. मला झोपही लागलेली नाही. माझे कुटुंबीय काबूलमध्ये असून, त्यांच्याशी संपर्कही झालेला नाही. माझी आई, भाऊ व बहिणीला जेवण मिळाले असेल का, ते कोठे राहत असतील, याची चिंता सतावत आहे. मी पुन्हा मायदेशी कधी जाईन, हे सांगता येत नाही. माझे भविष्य काय असेल, याचीही खात्री देता येत नाही. आता फक्त जगायचे कसे आणि कुटुंबाला सुरक्षित ठेवायचे कसे, हाच प्रश्न माझ्यासमोर आहे..'' अफगाणिस्तानातील काबूलचा रहिवासी २७ वर्षीय अमानुल्ला आदिल सांगत होता.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाचा अमानुल्ला विद्यार्थी. भारत सरकारची आयसीसीआर स्कॉलरशिप मिळवून तो विद्यापीठात शिकतो आहे.

पान ९ वर »



### काळजी घेणारे शिवाजी विद्यापीठ

भारतात कधीही असुरक्षिततेची भावना माझ्या मनात आली नाही. मला इथे चांगले मित्र-मैत्रीण मिळाले आहेत. अफगाणिस्तानातील परिस्थिती लक्षात घेत पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव माझी सातत्याने चौकशी करतात. मला कोणतीही कमतरता भासणार नाही, याची विद्यापीठ प्रशासन काळजी घेत आहे, असेही अमानुल्ला म्हणाला.

## आई, भावंडे सुरक्षित असतील काय?

» पान १ वरून

तो, जुलै २०१९ ला विद्यापीठात आला. विशेष म्हणजे 'ग्राउंड वॉटर मॅनेजमेंट इन कोल्हापूर सिटी' या विषयावर त्याचा अभ्यास सुरू आहे. तो मूळचा घोर प्रांतातील असून, शिक्षणासाठी त्याचे कुटुंबीय काबूलमध्ये स्थायिक आहेत.

अफगाणिस्तानवर तालिबान्यांनी कब्जा केल्याने तो हवालदिल झाला आहे. कुटुंबाविषयीच्या काळजीने तो व्याकूळ आहे. तालिबान्यांच्या कारवाया त्याच्या कानावर धडकत आहेत. त्याच्याशी संपर्क साधला असता, तो भावूक झाला. डबडबलेल्या डोळ्यांनी त्याने भावनांना वाट करून दिली.

अमानुल्ला म्हणाला, ''मी लहान असताना माझ्या डोळ्यांसमोर तालिबान्यांनी केलेले हल्ले अनुभवले आहेत. तालिबान्यांच्या कारवाया अफगाणिस्तानात सुरू असल्या तरी त्याची झळ मला येथे सोसावी लागत आहे. माझ्या शिक्षणाचा हट्ट धरणारी आई फातिमा, भाऊ महंमद, बहीण मासुमा, काका झाहीर काय करत असतील; ते कोठे आणि सुरक्षित असतील का, असे हजारो प्रश्न मनात थैमान घालत आहेत. तीन दिवसांपासून त्यांच्याशी संपर्क झालेला नाही. काबूलमध्ये विमानावर बसलेले लोक पाहून मन सैरभैर झाले आहे. माझ्या देशातील २००१ नंतरच्या पिढीला शिकायचे आहे. ती स्वतःच्या हक्कासाठी लढणारी आहे. केवळ पैशासाठी ती वाममार्गाला जात आहे. माझ्या कुटुंबाला मला या प्रवाहापासून अलिप्त ठेवायचे आहे. त्यामुळेच मी भारतात शिकायला आलो आहे.''

तो म्हणाला, ''अफगाणिस्तानात पाणी प्रदूषण गंभीर आहे. तिथल्या जनतेला स्वच्छ पाणी मिळावे, ही माझी इच्छा आहे. त्यासाठी मी कोल्हापुरातील पाणी प्रदूषणाचा अभ्यास करत आहे. येथे केलेल्या अभ्यासाचा फायदा माझ्या देशासाठी करायचा आहे; मात्र, आता देशातील स्थिती पाहता मी कधी तिकडे परतेन, हे सांगता येत नाही. माझा व्हिसा डिसेंबरपर्यंत आहे.''

### आईचे प्रोत्साहन आणि आधार

मला शिक्षणासाठी प्रोत्साहित करणारी माझी आई फातिमा आहे. माझ्या वडिलांचे २००३ ला निधन झाल्यानंतर तिनेच मला आधार दिला. तीच माझा बाप झाली. माझ्या शिक्षणासाठी आईने घोर प्रांत सोडण्याचा निर्णय घेतला. आम्ही काबूलचे रहिवासी झालो. तेथे भाडेतत्त्वावरील घरात राहतो. बहीण मासुमा, काका झाहीर, भाऊ महंमद मला शिक्षणासाठी प्रोत्साहन देतात. महंमद टॅक्सी ड्रायव्हर आहे, असे अमानुल्ला म्हणाला.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज पर्यावरण तज्ज्ञांसोबत महापूरप्रश्नी बैठक

कोल्हापूर : महापुराची कारणे व उपाय यासंबंधी राज्यातील पर्यावरण तज्ज्ञांच्या दोन दिवसीय कोल्हापूर दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. १८) दुपारी २.३० वाजता शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागात ही बैठक होणार आहे. या बैठकीस पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ, जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे उपस्थित राहणार आहेत. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.